**तक्रारकर्त्याची स्वत:ची शपथेवर पुढील सरतपासणी त्याचे विधीज्ञ श्री.एस.व्ही.नाहर यांचेमार्फत सुरु....**

मी पुराव्याचे शपथपत्र दिले असून, त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे त्यावर माझी स्वाक्षरी आहे त्यास **निशाणी क्र.२३** देण्यात येतो. मी दस्तऐवज यादी नि.क्र.२८ खाली आरोपीने मला एस.डी.एफ.सी.बुॅक, शाखा मलकापुर, रक्कम रूपये ७२,१२०/- दिनांक २१-०७-२०२२ चा धनादेश क्रमांक ०००००१ याची अस्सल प्रत, दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.४१** देण्यात येतो. पुढे मी दस्तऐवज यादी नि.क्र.३४ खाली धनादेश नि.क्र.४१ बॅंकेमध्ये जमा केला असता तो "पुरेशा निधी नाही" या कारणावरून अनादरीत झाल्याबाबत धनादेश वापसी मेमो दिनांक २२-०७-२०२२ अस्सल प्रत दाखल केला आहे. त्यास **नि.क्र.४२** देण्यात येतो. पुढे मी दस्तऐवज यादी नि.क्र.०४ खाली आरोपीला दिनांक ०६-०८-२०२२ रोजी माझे विधीज्ञांमार्फत पाठविलेली नोटीस कार्यालयीन प्रत व सदर नोटीस पोष्टाने पाठविल्याबाबत पोष्टाची पावती आणि पोहोच पावती, या दस्तांच्या अस्सल प्रती दाखल केल्या आहेत. त्यांना **निशाणी क्र.४३ ते ४५** देण्यात येते.

**सरतपासणी पुर्ण.**

**अर्ज नि.क्र.४६ वरील आदेशाप्रमाणे आरोपीची तक्रारकर्त्याची उलट तपासणी घेण्याकरिता वेळ मिळण्याबाबत मागणी नामंजुर. करिता उलटतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2025.12.11 17:01:39 +0530

**(सुनिल स. महाले)**
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी
मलकापूर.

दिनांक : ११.१२.२०२५